My com./d/Zone 1 to 6 /letter/patil sir/DY.DIRECTOR/225/LEGALletter

शिक्षण विभाग (मनपा)
आवक क्र. 1204
दिनांक 7/6/14

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (लेखा व वित्त विभाग)

क्रमांक :– 98 / प्रलेपिज / 2014 दिनांक : 07 / 06 / 2014

## परिपत्रक

प्रति,

1) सर्व विभाग प्रमुख,
महानगरपालिका, नागपूर
2) सहाय्यक आयुक्त ( सर्व झोन ),
महानगरपालिका, नागपूर

विषय :– नागपूर महानगरपालिकेच्या नियमित कर्मचाऱ्यांना दिनांक 1 एप्रिल, 2014 पासून वाहतूक भत्ता वाढ लागू करण्याबाबत.

संदर्भ :– 1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक – वाहन – 2014 / प्र.क्र–5 / सेवा–5, दिनांक 3 जून, 2014.

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयानुसार राज्य शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना देय असलेल्या वाहतूक भत्त्यांच्या दरात ( संदर्भिय शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे ) वाढ करण्यास मंजूरी दिलेली आहे. सोबत वर नमूद शासन निर्णयाची प्रत जोडली आहे. त्याच धर्तीवर वर नमूद शासन निर्णयानुसार महानगरपालिकेतील नियमीत आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना व अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असणाऱ्या मनपाचे पात्र कर्मचाऱ्यांना सध्या अनुज्ञेय असणाऱ्या वाहतूक भत्त्यामध्ये शासन निर्णयात नमूद सुधारीत दरानुसार वाहतूक भत्ता वाढ माहे 1 मे, 2014 पासून ( माहे मे, 2014 पेड ईन जून, 2014 ) प्रत्यक्ष वेतनात लागू करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

2) सदर वाहतूक भत्त्याचे वाढीची माहे एप्रिल, 2014 ची थकबाकीची रक्कम माहे मे, 2014 चे वेतन देयकासोबत प्रदान करावयाची आहे.

3) सदहू खर्च कर्मचाऱ्यांचे वेतन विभागाच्या ज्या आस्थापना व्यय पदांमधून आहरण करण्यात येते. त्या लेखा शिर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

सर्व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक कार्यवाहीकरीता सर्व संबंधितांच्या नजरेस आणावे.

( मा. आयुक्त यांचे दिनांक 06 / 06 / 2014 चे आदेशान्वये. )

सहपत्र :– वरीलप्रमाणे.

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी :–

1) उपसंचालक ( ले.प. ), म.न.पा. नागपूर
2) लेखा अधिकारी / निगम लेखापरिक्षक, म.न.पा.नागपूर यांना माहिती तथा कार्यवाही करीता.
3) सहा. अधिक्षक ( प्रशासन ), वित्त विभाग, म.न.पा. नागपूर यांना माहिती तथा कार्यवाही करीता.
4) ऑडीट कलर्क्स, वित्त विभाग, म.न.पा. नागपूर यांना आवश्यक कार्यवाही करीता.
5) चेक रायटर, वित्त विभाग, म.न.पा. नागपूर यांना आवश्यक कार्यवाही करीता.

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वाहतूक भत्त्याच्या (Transport Allowance)दरांतसुधारणा करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

### शासन निर्णय क्रमांकः वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५

मंत्रालय,मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२

तारीख: ०३ जून ,२०१४.

वाचा —

१) शासन निर्णय क्रमांकः केंद्र शासन,वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.२१(२)/ २००८-इ-दोन-बी दिनांक-२९ ऑगस्ट,२००८.

२) शासन निर्णय क्रमांकः शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.वाहभ-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५, दिनांक ५ एप्रिल,२०१०.

प्रस्तावना —

केंद्र शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वरील (१) येथील दि.२९ ऑगस्ट,२००८ रोजीच्या आदेशान्वये त्यांच्या कर्मचाऱ्याच्या निवासस्थानापासून कर्तव्य स्थानापर्यंतच्या प्रवासावरील खर्चाची भरपाई म्हणून सुधारीत दराने वाहतूक भत्ता (Transport Allowance)मंजूर केलेला आहे.महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम,२००९ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.१ जानेवारी,२००६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आलेली आहे.त्यानुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वाहतूक भत्त्याच्या दरांत वरील (२) येथील दि.५एप्रिल,२०१० च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.तथापि सद्यस्थितीत इंधनाचे वाढलेले दर व त्यानुषंगाने वाहतूकीच्या भाड्यात झालेली वाढ लक्षात घेता प्रचलीत असलेल्या वाहतूक भत्त्याच्या दरात काही प्रमाणात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना देय असलेल्या वाहतूक भत्त्याच्या दरात शासन निर्णय,वित्तविभाग,दि.५ एप्रिल,२०१० अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयातील दरांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ग्रेड वेतन | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रु.) | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १. | रु.५४००/- व त्याहून अधिक | रु.२४००/- | रु.१२००/- |
| २. | रु.४४००/- व त्याहून अधिक मात्र रु.५४००/- पेक्षा कमी | रु.१२००/- | रु.६००/- |
| ३. | रु.४४००/- व त्याहून कमी | रु.४००/- | रु.४००/- |

तसेच अंध,आस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असणा-या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना सध्या अनुज्ञेय असणा-या वाहतुक भत्यामध्ये पुढील प्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ग्रेड वेतन | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रु.) | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १. | रु.५४००/- व त्याहून अधिक | रु.४८००/- | रु.२४००/- |
| २. | रु.४४००/- व त्याहून अधिक मात्र रु.५४००/- पेक्षा कमी | रु.२४००/- | रु.२०००/- |
| ३. | रु.४४००/- व त्याहून कमी | रु.२०००/- | रु.२०००/- |

हे आदेश दि.१ एप्रिल,२०१४ पासून अंमलात येतील.

वाहतूक भत्त्याच्या प्रयोजनार्थ शासन निर्णय वित्त विभागक्र.वाहभ-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५,दिनांक-५ एप्रील,२०१० मधील इतर विद्यमान तरतुदी व कार्यपध्दती आहे त्याच प्रकारे यापुढे लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६०३१२१५५१३४०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Sunil Digitally signed by Varsha Sunil Dongre